## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ८५२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३१/१२/२०१६

**१) भांडण करुन लाकडी काठीने मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २०/१२/२०१६ रोजी १५.०० वा. दर. यातील आरोपीने फिर्यादीस 'तु माझे अंगणात मुरुम का टाकला' असे म्हणाल्यावर गावातील सरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, पोलीस पाटील यांना बोलवुन ते निर्णय देतील त्यानुसार तुझ्या अंगनात मुरुम टाकनार नाही असे म्हटले असता ओरोपीने भांडन करुन लाकडी काठीने फिर्यादीचे डावे हाताचे भुजेवर मारुन जखमी केल्याने व शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्यान फिर्यादीची तोंडी तक्रार व डॉ. रिपोर्ट पी.एस.सी दिघोरी व सा.रु भंडारा येथील एक्सरे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३२५,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**२) ट्रॅक्टर चालकांच्या निष्काळजीपणामुळे एक जखमी . :–**

दिनांक २३/१२/२०१६ रोजी २१.०० वा. दर. यातील फिर्यादी व त्याचा मित्र सागर मोहन गुप्ता दोन्ही रा. तुमसर हे बजाज पल्सर मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु १७१७ ने नागपुर कडुन वरठी मार्गे तुमसर येथे जात असतांनी वरठी रेल्वे ब्रीज वरुन विरुध्द दिशेने येत असलेला बिना क्र. चा ट्रॅक्टर ज्याला लोखंडी नागर जोडलेला असुन आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल ला कट मारुन लोखंडी नागर जखमी सागर गुप्ता याचे उजव्या पायाला लागुन पाय फॅक्चर करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी पियुश ओमप्रकाश जैसवाल वय २८ वर्ष, रा. शिवाजी वार्ड तुमसर याचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. हलमारे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन जातीवाचक शिविगाळ केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/१२/२०१६ रोजी १०.०० वा. दर. यातील फिर्यादी व आरोपी यांचे दुकान नाकाडोंगरी मेन चौकात पुर्व दिशेला असुन दोन्ही वेगवेगळया जातीचे आहेत यातील फिर्यादी ही आपल्या सुने सोबत दुकान उघडण्यास आली असता यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी व फिर्यादीचे सुनेला अश्लिल शब्दात शिविगाळ करुन व जातीवाचक शब्दात बोलुन सार्वजनीक ठिकाणी अपमानास्पद बोलले असे फिर्यादीने दिनांक ३०/१२/२०१६ ला पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २९४,५०४,३४ भांदवि. सहकलम ३(१)(आर)(एस) अनुसुचीत जाती जमाती अ. प्रतीबंधक कायदा सुधारना अधिनियम २०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. साळी साहेब तुमसर हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक ३०/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १०७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२, तिन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.